Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – VI April 2016

# भारतातील अन्न सुरक्षा व सार्वजनिक वितरण व्यवस्था

प्रो. एस. पी. सोनकांबळे
पी. एच. डी. विद्यार्थींनी
पी. एच. डी. सेंटर, नॅनोपासक कॉलेज,
जितूंर, परभणी.

डॉ. डी. के. शिंदे,
पी. एच. डी. मार्गदर्शक,
नॅनोपासक कॉलेज, जितूंर, परभणी.

## प्रस्तावना

अन्न, वस्त्र आणि निवारा हया मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्यापैकी अन्न ही मनुष्याची पहिली गरज आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम – 21 नुसार प्रत्येक व्यक्तिला अन्नधान्याचा अधिकार मान्य केलेला आहे. भारतात हा विकसनशील देश आहे. स्वातंत्र मिळाल्यापासून भारताचे आर्थिक नियोजन सुरू झाले. भारताची राज्य व्यवस्था लोकशाही पध्दतीने चालते. अशा देशामध्ये प्रत्येक माणसाला पुरेसे अन्न मिळणे हा त्याचा एक मूलभूत हक्क आहे आणि हा हक्क मिळवून देणे हे देशातील लोकशाही राज्य व्यवस्थेचे व आर्थिक नियोजनाचे आद्य कर्तव्य आहे.

प्रा. नर्क्सच्या मतानूसार,गरीब देशांनी सतत दिर्घकाळ टिकून राहिलेले दारिद्रय समुळ न नष्ट केल्याशिवाय देशाच्या आर्थिक विकासाचा मार्ग सुखकर व मोकळा होणार नाही किंवा देशाचा आर्थिक विकस साध्य होणार नाही. मा. गांधी यांनी सन 1920 मध्ये यंग इंडिया या लेखामध्ये असे लिहिली आहे की, आपल्या देशात केवळ मोठया प्रमाणावर चांगले उत्पादन करून राष्ट्रीय एकता दाखवता येणार नाही, तर त्यासाठी उत्पादन आणि वितरण या दोन्ही पध्दतीचा योग्यरितीने वापर केला पाहिजे.

देशाच्या आर्थिक विकास म्हणजे सतत दरडोई उत्पन्न वाढत असतांना वा वास्तविक आर्थिक विषमता कमी येणा–या दिर्घकालीन प्रक्रियेस आर्थिक विकास म्हटले जाते. याचाच अर्थ असा की आर्थिक विकास होत असतांना लोकांचे दरडोई उत्पन्न सतत वाढले पाहिजे ही प्रक्रिया हि काळपर्यंत चालली पाहिजे तेव्हाच देशाचा आर्थिक विकास झाला असे म्हणता येते.

## संशोधनाची उदिष्टे

- भारताची अन्न सुरक्षेचा आढावा घेणे.
- सार्वजनिक वितरण प्रणालीचा कार्याचा आढावा घेणे.
- सार्वजनिक वितरण अन्न व्यवस्थेचा प्रगतीचा आढावा घेणे.

## भारतातील अन्न सुरक्षा

सन 1986 मधील जागतिक विकास अहवालामध्ये अन्न सुरक्षेची जी व्याख्या केली ती म्हणजे देशातील सर्व लोकांचा चांगले जीवन जगता यावे यासाठी वेळेवर व पुरेसे अन्न मिळणे म्हणजे

अन्नसुरक्षितता होय. भारतीय अन्न कृषी संघटनेने फॅक – 1983 अन्न सुरक्षतेची व्याख्या केली आहे ती अशी की, अन्न सुरक्षिता म्हणजे देशातील सर्व लोकांना गरजेनुसार केव्हाही भौतिक आणि आर्थिक जीवन जगण्यासाठी पूरेसे अन्न मिळणे होय.

साधारण अन्न सुरक्षा म्हटले की, लोकांकरिता किमान अन्नधान्याची पुर्तता करणे असा मर्यादित अर्थ लावला जातो. परंतु या किमान अन्नधान्यामध्ये देखील योग्य अशी गुणवत्ता व त्याची योग्य मात्रा असणे आवश्यक असते. त्यासाठी प्रथमत आपला देश हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी असणे आवश्यक ठरते. देश जर अन्नधान्याच्या बाबतीत स्वावंलबी असेल तरच त्या देशातील वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याच्या किमान पुरवठा करता येतो. तसेच त्यांच्या उत्पन्नात देखील वाढ करता येते. त्या दृष्टीने भारताने स्वातत्रपासून योजना कार्यान्वीत करून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनविण्यासाठी विविध योजना आखण्यास सुरूवात केली.

अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता राखणे नियोजनकारांचे महत्वाचे उदिष्टे होते. ज्या देशात अन्नधान्याचा साठा मोठया प्रमाणात केलेला असतो तो देश इतर देशांबाबत ते एक शस्त्र म्हणून वापरतो. याचा अनुभव भारताने घेतला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या संदर्भाता असे म्हटले आहे की, जेव्हा आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनू तेंव्हाच आपल्या देशाची प्रगती व विकास संभव आहे ज्यावेळेस भारतात सन 1965 आणि सन 1966 मध्ये दुष्काळ पडला, तेव्हा अमेरिकन सरकारने पी.एल. 480 कलमानुसार अन्नधान्याच्या आयातीवर अनेक बंधन लादलेली होती.

सन 2001 च्या जणगणनेनुसार भारतात 36 कोटी लोक दारिद्रय रेषेखालील जीवन जगत आहेत. तेव्हा त्या सर्वांना अन्नधान्याचा पुरवठा करणे ही सरकारची जबाबदारी आहे. देशातील सर्व लोकांना त्यांच्या उपभोगाकरिता आवश्यक अन्न मिळावे यासाठी सरकारने सन 2009 मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा करण्याची घोषणा केली. त्यानुसार देशातील दारिद्रय रेषेखालील प्रत्येक कुटूंबाना दर महिन्याला 35 किलो अन्नधान्य रू. 3 प्रति किलो या दराने देण्याचे ठरविण्यात आले. देशातील लोकांना अन्न धान्याचा पुरवठा करणे हे सरकारने आद्य कर्तव्य असल्याने सरकारने हे पाउल उचलेले आढळून येते.

जागतिक भूक निर्देशाकानुसार जगातील 88 देशामध्य भारत 66 व्या क्रमाकांवर आहे. भारतीय मध्ये प्रदेश, झारखंड, बिहार छत्तीसग, गुजरात ही राज्ये अन्न सुरक्षेपासून अद्यापही बरची दूर आहेत. देशातील 200 मिलीयन लोकसंख्या आजही अर्धपोटी असून अल्पपोषण, रक्ताल्पता हया समस्येने ग्रस्त आहेत.

**सार्वजनिक वितरण व्यवस्था –**

सार्वजनिक वितरण कायदा ही देशातील लोकांची अन्नसुरक्षितता व समाज कल्याण सुधारणा करण्याचे एक प्रमुख साधन आहे. देशात उत्पादीत होणारे अन्नधान्य लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरू केली? या व्यवस्थेच्या स्थापनेमागे सरकारचे प्रमुख तीन हेतू होते ते म्हणजे,

1. अन्नधान्याच्या किंमतीमध्ये स्थैर्य निर्माण करणे.
2. शेतक–यांसाठी काही शेतमालाच्या आधारभूत किंमती ठरविणे.
3. गरीब लोकांना चांगल्या दर्जाचे अन्नधान्य पुरेशा प्रमाणात व माफत उपलब्ध करून देणे.

ही योजना दोन गोष्टींवर आधारलेली आहे.

अ. किमान आधारभूत किंमतीला शेतक–यांकडून धान्य खरेदी करणे.
ब. देशभर निर्माण करण्यात आलेल्या स्वस्त धान्य दुकानाच्या साखळीद्वारे गरजू लोकांना अन्नधान्य पुरविणे.

अल्प उत्पन्न गटातील लोकांच्या हिताचे रक्षण करणे ही या योजनेची प्रमुख जबाबदारी आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे अन्न सुरक्षिततेचे एक परिणामकारक जाळे निर्माण करण्यात आले. देशातील दारिद्रय रेषेखालील आणि दुर्गम भागातील कुटूंबाना प्रामुख्याने निवडक अशा जीवनावश्यक वस्तू परवडणा–या किंमतीत उपलब्ध करून देण्याचे सार्वजनिक वितरण व्यवस्था ही प्रमुख माध्यम असून शासनाच्या दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमातील तो एक महत्वाचा घटक आहे. ही व्यवस्था शिधा वाटप व स्वस्त धान्य दुकाने यांच्या मार्फत कार्य करते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेकडून अन्नधान्यासंबंधीचे वाटप भारतीय अन्नधान्य विभागात काम करण्याचे विशेष पध्दतीचा एक अविभाज्य पैलू आहे. सरकार स्वस्त धान्य दुकानाचा माध्यमाने स्वस्त धान्य दुकानदाराद्वारे उपभोक्त्यांना प्रामुख्याने आर्थिक मदत म्हणून अन्नधान्य वाटप करते.

**भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेची प्रगती –**

भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये अलीकडील काही वर्षात मोठा बदल झाल्याचे दिसून येते. अन्नधान्याचे उत्पादन सन 2011.02, 2002.3, 2003 ,2003–4,2004–05, 2005–06 आणि 2008–09 या वर्षात खूपच खाली आले होते. परंतु इतर कालावधीत समाधान कारक उत्पादन झाले होते. अभ्यास कालावधी दरम्यान तांदुळ आणि गहू या धान्याच्या खरेदीमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. सन 200–01 साली 35.45 दक्षलक्ष टन असलेली धान्य खरेदी ही सन 2008–09 मध्ये 55.50 दक्षलक्ष टनापर्यंत वाढली.धान्याच्या साठयात सन 2000–01 पासून वाढ होउन ती 2008–09 मध्ये 48.25 दशलक्ष टनापर्यंत वाढली. सन 2009–10 मध्ये साठयाचा निकष 15. 80 दशलक्ष टनावरून 20.00 दशलक्ष टन असा सुधारण्यात आला.

देशामध्ये सन 2000.01 ते 2009.10 या कालावधीत धान्याची दरडोई सरासरी उपब्धता ही 441.21 ग्रॅम एवढी होती. याच कालावधीत गहू आणि तांदळाच्या किमान आधारभूत किंमतीस सरासरी अनुके 7.22 टक्के आणि 7.53 टक्के इतकी वाढ करण्यात आली. या कालावधीत तांदुळ आणि गव्हाच्या ख–या किंमती अनक्रमे 5.81 टक्के व 6.13 टक्के एवढया वाढविण्यात आल्या. या कालावधीत तांदळाची खरेदी व उचल या दोहोतही वाढ झाली. मात्र खरेदी वाढूनही त्याची उचल घटली. अभ्यास कालावधी दरम्यान केंद्र सरकारच्या अन्न अनुदानामध्ये झपाटयाने वाढ झाली आहे.

सन 1951 पासून भारतात लोकसंख्या वाढीपेक्षा धान्योत्पादन वाढीचा दर हा जास्त राहिला आहे. परंतु सन 2000–01 ते 2008 या कालावधी दरम्यान धान्य व डाळींची निव्वळ उपल्ध्धता ब–याच प्रमाणात घटल्याचे दिसून येते. या कालावधीमध्ये डाळीच्या उपलब्धतेमध्ये सरासरी 4.99 टक्के तर अन्नधान्याच्या उपलब्धतेत सरासरी ऋण –1.18 टक्के असल्याचे आढळून येते.

सन 1997 पासून जेव्हा लक्ष्याधारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरू करण्यात आली तेव्हापासून शासनाने दारिद्रय रेषेखालील बी.पी.एल व दारिद्रय रेषेवरील ए.पी.एल. लोकांसाठी वेगवेगळे विरणाचे दर निश्चित करणे सुरू केले आहे. सन 2000–01 या वर्षाचा अपवाद वगळता दोन्ही धान्य प्रकारच्या बाबतीत दारिद्रय रेषेवरील लोकांसाठी असलेल्या वितरण दरात घट झालेली दिसून येते.

सारांक्ष

मानवाच्या गरजांपैकी अन्नसुरक्षा ही गरज अत्यंत महत्वाची ही प्राथमिक मूलभूत गरज भागविणे हे व्यक्तीश जेवढे अन्न सुरक्षा देणे ही सरकारचीही जबाबदारी आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे ही गरज पूर्ण होणे हे महत्वाचे आहे.

संदर्भ –


- अर्थ संवाद जून 2006
- योजना ऑगस्ट 2013
- भारतीय अर्थव्यवस्था


GoEIIRJ